20 DEC 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुधवारी रंगणार विद्यापीठाचा दीक्षान्त सोहळा

## ग्रंथ महोत्सवासह विविध कार्यक्रम : अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे

■ सकाळ वृत्तसेवा



डॉ. रेड्डी

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त सोहळा बुधवारी (ता. २४) होत आहे. भारताचे प्रख्यात संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे आहेत. सोहळ्यात एकूण ४९ हजार ९०२ स्नातक पदवी घेणार आहेत. ग्रंथदिंडी, ग्रंथ महोत्सव असे उपक्रमही होणार आहेत. राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात सकाळी अकरा वाजता सोहळ्यास सुरुवात होईल. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी, तर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित असतील.



डॉ. रेड्डी चार दशकांहून अधिक काळ भारताच्या संरक्षण संशोधन व विकास आणि तंत्रज्ञान नेतृत्व क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्या मोलाच्या योगदानासाठी ते सर्वदूर ओळखले जातात. सध्या ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य, आंध्र प्रदेश शासनाचे मानद सल्लागार (कॅबिनेट दर्जा) तसेच एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आहेत.

**विद्याशाखानिहाय स्नातक असे :**

| विद्याशाखा | प्रत्यक्ष उपस्थित | | पोस्टाने | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | |
| विज्ञान व तंत्रज्ञान | २८५३ | ३५३१ | ७४३४ | ६५०१ | २०३१९ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १९०० | ३५९६ | ४४३१ | ७०७५ | १७००२ |
| मानव्यविद्या | १२७३ | २२६७ | २८४८ | ४१६३ | १०५५१ |
| आंतर विद्या शाखा | २४८ | ४९१ | ४०२ | ८८९ | २०३० |

सोहळ्यानिमित्त सलग १८ व्या वर्षी ग्रंथ महोत्सव २३ ते २४ डिसेंबर दरम्यान होणार आहे. त्यात नामवंत भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ, उपाहारगृह आदींचे ४० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. दरवर्षीप्रमाणे २३ डिसेंबरला ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी साडेसात वाजता कमला महाविद्यालयात प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत दिंडीचे उद्घाटन होईल. सकाळी दहा वाजता कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठाच्या अॅनेक्स इमारत प्रांगणात ग्रंथ महोत्सवास सुरुवात होईल. ग्रंथ महोत्सवातील स्टॉल दोन्ही दिवशी सकाळी नऊ ते रात्री नऊपर्यंत सुरू राहतील.

**यंदा ४९,९०२ स्नातक; मुलींचे प्रमाण ५७ टक्के**

सोहळ्यात पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखांच्या मिळून एकूण ४९,९०२ स्नातकांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. यात विद्यार्थिनींची संख्या २८,५१३ (५७.१४ टक्के) आहे. १६,१५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत, तर ३३, ७४३ स्नातक पोस्टाने पदवी घेणार आहेत. दीक्षान्त समारंभ झाल्यानंतर स्नातकांना त्यांची प्रमाणपत्रे त्यांच्या नॅशनल अॅकॅडेमिक रिपॉझिटरी अकाउंटमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## पदक आई-वडिलांना समर्पित : अक्षय नलवडे



अक्षय नलवडे

क्रीडा, बौद्धिक व कला, एनसीसी, एनएसएसमधील गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्वगुण यात आदर्श ठरल्याबद्दल अक्षय नलवडे-जहागीरदारला राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर झाले. तो मूळचा नावडी (ता. पाटण, जि. सातारा) येथील आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक एक, तर माध्यमिक शिक्षण ठक्कर बाप्पा माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातून झाले. त्याने दहावीला ६३, तर बारावी विज्ञान शाखेतून ६३ टक्के गुण मिळविले. कऱ्हाडच्या यशवंतराव चव्हाण सायन्स महाविद्यालयातून त्याने बी. एस्सी. फिजिक्सची पदवी मिळवली. तो शेतकरी कुटुंबातील असून, त्याचे आई-वडील शेती करतात. कुटुंबातील तो पहिला पदवीधर आहे. तो म्हणाला, 'मला मिळालेले पदक मी माझे श्रद्धास्थान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण, लोकनेते दिवंगत बाळासाहेब देसाई, शिवाजी विद्यापीठाला जागा देणारे शेतकरी व आई-वडिलांना समर्पित करतो. हे पदक मला मिळाल्याने खूपच आनंद झाला आहे.'

## मेहनतीचे फळ मला मिळाले : आर्या देसाई



आर्या देसाई

हुपरीच्या महावीरनगरमधील आर्या देसाईने मार्च २०२५ मध्ये एम. ए. परीक्षेत 'मानसशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण मिळविले. तिला कुलपती सुवर्णपदक जाहीर झाले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण हुपरीतील लक्ष्मीदेवी गर्ल्स स्कूलमधून झाले.

तिने दहावीला ९२ टक्के गुण मिळविल्यानंतर कोल्हापुरातील राजाराम महाविद्यालयात कला शाखेला प्रवेश घेतला. मानसशास्त्र विषयातून तिने पदवी, तर पुढे उरुण-ईश्वरपूरमधील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातून एम. ए.ची पदव्युत्तर पदवी मिळवली.

तिची आई गृहिणी असून, वडील चांदी व्यावसायिक आहेत. ती म्हणाली, 'मी घेतलेल्या मेहनतीचे फळ मला मिळाले आहे. नोकरी करत मी अभ्यास केला. शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. अथक परिश्रमामुळे काहीही साध्य करता येते, असा माझा विश्वास आहे. तो पदकाने अधिकच दृढ झाला आहे.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा २४ रोजी दीक्षान्त समारंभ

## ज्येष्ठ संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे; अक्षय जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



**डॉ. जी. सतीश रेड्डी**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ बुधवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. भारताचे संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभात ४९ हजार ९०२ स्नातक पदवी घेणार आहेत. समारंभानिमित्त विद्यापीठात ग्रंथदिंडी, ग्रंथ महोत्सव आदी उपक्रम आयोजित केले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

राज्यशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी अक्षय अरुण नलवडे-जहागीरदार यांना विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. तसेच, मार्च २०२५ मध्ये सर्व एम.ए. परीक्षांमधून 'मानसशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल आर्या संजय देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर केले आहे.

दि. २३ डिसेंबरला ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी ७.३० वाजता कमला महाविद्यालयात कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन होईल. दिंडीचे राजमाता जिजाऊ साहेब सभागृहातील दीक्षान्त सभामंडपात आगमन होऊन तेथे विसर्जन होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठाच्या ॲनेक्स इमारत प्रांगणात ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. ग्रंथमहोत्सवातील स्टॉल दोन्ही दिवशी सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सुरू राहणार आहेत.

### प्रमुख पाहुणे डॉ. जी. सतीश रेड्डी यांच्याविषयी...

दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. जी. सतीश रेड्डी हे चार दशकांहून अधिक काळ भारताच्या संरक्षण संशोधन व विकास आणि तंत्रज्ञान नेतृत्व क्षेत्रात कार्यरत आहेत. सध्या ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य, आंध्र प्रदेश शासनाचे मानद सल्लागार (कॅबिनेट दर्जा) व एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया संस्थेचे अध्यक्ष आहेत. यापूर्वी त्यांनी संरक्षण संशोधन व विकास विभागाचे सचिव, डी.आर.डी.ओ.चे अध्यक्ष व केंद्रीय संरक्षणमंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार, अशी महत्त्वाची जबाबदारीची पदे भूषविली आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 DEC 2025
पुढारी

# हॉटेलात काम करणारा साताऱ्याचा अक्षय नलवडे ठरला राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



घरची परिस्थिती बेताची... आई-वडील शेतकरी... खासगी नोकरी करून तर कधी प्रसंगी हॉटेलात कपबशा धुवून शिक्षणातील संघर्ष यशात बदलवून अक्षय नलवडे-जहागीरदार यंदाच्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभातील राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरला आहे.

अक्षय हा मूळचा नावडी (ता. पाटण, जि. सातारा) येथील असून, घरची परिस्थिती बेताची आहे. आई-वडील दोघेही शेती करतात. त्याचे माध्यमिक शिक्षण ठक्करबाप्पा ज्यु. कॉलेज मारुल हवेली येथे झाले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, कराड येथे पदवीचे शिक्षण पूर्ण केले. सध्या तो शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. पार्ट टाईम खासगी नोकरी करून अक्षय स्वत:चा शिक्षणाचा खर्च भागवत आहे. त्यामधूनच आई-वडिलांनादेखील पैसे पाठवतो. अनेकवेळा अपुऱ्या पैशांमुळे अडचणी येतात व त्यावर मार्ग काढून न खचता शिक्षण घेत आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक हे 'महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई, शिवाजी विद्यापीठास जमीन देणारे कोल्हापुरातील शेतकऱ्यांना समर्पित करीत आहे. पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर स्वत:चे पीआर कन्सलटन्सी व मीडियावरील स्टार्टअप सुरू करणार असल्याचे अक्षय याने सांगितले.

**शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने...**

# कुलपती मेडल विजेती आर्या देसाईचा मेंटल हेल्थवर काम करण्याचा मानस

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



चांदीची नगरी म्हणून ओळख असणाऱ्या हुपरी (ता. हातकणंगले) येथील आर्या देसाईने शिवाजी विद्यापीठाच्या यावर्षीच्या दीक्षान्त समारंभातील कुलपती मेडल पटकावले आहे. मानसशास्त्राची विद्यार्थी असणाऱ्या आर्याने कोल्हापुरात मेंटल हेल्थवर काम करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

आर्या हुपरी येथील असून, वडील चांदी व्यावसायिक, तर आई घरकाम करते. ती मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. तिचे कॉलेजचे शिक्षण राजाराम महाविद्यालयात झाले. त्यानंतर उरुण ईश्वरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेताना तीन वर्षे खासगी नोकरी केली. पदव्युतर पदवी मानसशास्त्र (क्लिनिकल सायकॉलॉजी) विषयातून पूर्ण केली. त्यावेळी सावली केअर सेंटरमध्ये काम केले. सध्या जोधपूर (राजस्थान) विद्यापीठामध्ये 'आरसीआय' लायसन्सचे शिक्षण घेत आहे. तसेच बिव्हेरियल थेरपीस्ट म्हणून काम करून स्वत:चा खर्च भागवत आहे. कुलपतींचे मेडल मिळाल्याचा खूप आनंद आहे.

आतापर्यंत केलेले सर्व कष्ट सत्कारणी लागले आहेत. आगामी काळात मानसिक आरोग्यासंदर्भात काम करण्याचे स्वप्न असल्याची भूमिका आर्याने मांडली.

2 0 DEC 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा बुधवारी दीक्षांत समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ येत्या बुधवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता होत आहे. प्रख्यात संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे असून, अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, तर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित असतील. या समारंभात ४९ हजार ९०२ स्नातक पदवी घेणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



डॉ. जी. सतीश रेड्डी

या समारंभानिमित्त सलग १८ व्या वर्षी ग्रंथ महोत्सवाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे २३ डिसेंबरला ग्रंथदिंडी काढण्यात येईल. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

**यंदा ४९,९०२ स्नातक घेणार पदवी**

या समारंभात पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखा या चार विद्याशाखांच्या मिळून ४९ हजार ९०२ स्नातकांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत. यामध्ये विद्यार्थिनींची संख्या २८ हजार ५१३ (५७.१४ टक्के) इतकी लक्षणीय आहे. १६ हजार १५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत, तर ३३ हजार ७४३ स्नातक पोस्टाने पदवी घेणार आहेत.



अक्षय नलवडे-जहागीरदार



आर्या देसाई

या शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र, तसेच एनसीसी, एनएसएस यांमधील गुणवत्ता, तसेच व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल राज्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी अक्षय अरुण नलवडे-जहागीरदार यांना विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले, तर सर्व एम.ए. परीक्षांमधून मानसशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल आर्या संजय देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर केले आहे.

20 DEC 2025
लोकमत

# अक्षय जहागीरदार यांना राष्ट्रपती; आर्या देसाई यांना कुलपती पदक

## शिवाजी विद्यापीठाचा बुधवारी दीक्षान्त समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ येत्या बुधवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असून प्रख्यात संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील; तर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित असतील.

यंदाच्या दीक्षान्त समारंभात एकूण ४९,९०२ स्नातक पदवी घेणार आहेत. राज्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी अक्षय अरुण नलवडे-जहागीरदार यांना विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. तसेच, मार्च २०२५ मध्ये एम.ए. परीक्षांमधून 'मानसशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल



अक्षय जहागीरदार    आर्या देसाई

### ४९,९०२ स्नातक घेणार पदवी

यंदाच्या दीक्षान्त समारंभात पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतर विद्याशाखा या चार विद्याशाखांच्या मिळून एकूण ४९,९०२ स्नातकांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये विद्यार्थिनींची संख्या २८,५१३ (५७.१४%) इतकी लक्षणीय आहे. १६,१५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून तर ३३७४३ स्नातक पोस्टाने पदवी घेणार आहेत.

आर्या संजय देसाई यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

20 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत

तरुण भारत

विद्यापीठातून

- प्रख्यात संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे
- अक्षय जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक
- आर्या देसाई यांना कुलपती सुवर्णपदक



डॉ. जी. सतीश रेड्डी



अक्षय नलवडे



आर्या देसाई

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ बुधवारी दि.२४ रोजी सकाळी ११ वाजता आहे. भारताचे प्रख्यात संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अक्षय अरुण नलवडे–जहागीरदार यांना विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक तर आर्या संजय देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभात एकूण ४९ हजार ९०२ स्नातक पदवी घेणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील तर प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित असतील. समारंभानिमित्त विद्यापीठात ग्रंथदिंडी, ग्रंथ महोत्सव आदी उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ही माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभानिमित्त सलग १८ व्या वर्षी ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २३ ते २४ डिसेंबर रोजी होणाऱ्या या महोत्सवात नामवंत भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजीटल ग्रंथ, उपाहारगृह इत्यादींचे ४० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. या निमित्त दरवर्षीप्रमाणे २३ डिसेंबरला ग्रंथदिंडी काढण्यात येईल. सकाळी ७.३० वाजता कमला महाविद्यालयात कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन होईल. तेथून जनता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तंत्रज्ञानाचा जेवढा फायदा होतो त्याच्या कितीतरी पटीने तोटाच होतो असं आजकाल दिसून येत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा दुरुपयोगच फार मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. देशात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण इतके वाढीस लागले आहे की जी बाब भारतासारख्या विकसनशील देशाला परवडणारी नाही. देशात सायबर गुन्ह्यांच्या नव्या डाटानुसार दर मिनिटाला ५०० हून अधिक गुन्हे घडताना उघडकीस येत आहेत. एका अहवालानुसार ए. आय. प्रणालीचा जास्त प्रमाणात धोका दिल्ली, महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या महत्वाच्या राज्यात वाढल्याचे समाज माध्यमातून निदर्शनास येते. ऑनलाईन फसवणूक, डाटा चोरी किंवा हॅकिंग यामुळे सायबर सुरक्षेची गरज फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. सायबर गुन्हेगारीमुळे देशातील सर्वसामान्य जनतेला फार मोठ्या प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. याबाबत वेळीच आळा बसावा यासाठी आवश्यक ती कार्यवाही केंद्र शासनाकडून करणे अपेक्षित आहे.

**संजय तांबे**, फोंडाघाट

## योगी आदित्यनाथांसारखा मुख्यमंत्री असावा

जेव्हा पंच, सरपंच, आमदार, मंत्री व मुख्यमंत्री भ्रष्टाचारविना काम करतील तसेच गणवत्ता व ज्येष्ठता



नि
सा
आदित्यनाथ यांच्यासार
रामराज्य निर्माण होईल.
साधना करणाऱ्याला पै
खात नाही व दुसऱ्याल
एकही राजकीय पक्षा
नाहीत. नुसता वरवरचा
जनतेला साधना कर
तेव्हाच तो जनतेला
शिक्षणात साधना शिव
तेव्हाच आतंकवाद व
रामराज्य म्हणजेच ई
कलियुगा अंतर्गत सत्यु
कधीच वाया जात नर
आपल्या व समाजाच्या
एवढे लक्षात ठेवूया.

**'पडसाद' साठी लि**

वाचकांनी आपले नाव, पत्ता, मोबाई
लिहावा. कमीत कमी शब्दात जास्ती
प्रदीर्घ पत्रांना जागेअभावी स्थान देणे
पत्रे 'पडसाद' विभाग, दै. तरुण भार
५९०००१ या पत्त्यावर पाठवावीत.

20 DEC 2025
तरुण भारत

# नववर्षात शिवाजी विद्यापीठात स्पार्क फिल्म फेस्टिव्हल होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात २ आणि ३ जानेवारी २०२६ रोजी स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. पर्यावरणविषयक शॉर्टफिल्म आणि डॉक्युमेंटरीच्या राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात येणार आहेत, अशी माहिती बी. ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग, लक्ष्मी फौंडेशन आणि किर्लोस्कर ऑईल इंजिन यांच्या संयुक्त विद्यमाने या फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. स्पर्धा मास कम्युनिकेशन विभागात होईल. स्पर्धकांनी पर्यावरण विषयावर २० मिनिटांपर्यंत शॉर्टफिल्म किंवा डॉक्युमेंटरी सादर करायची आहे. २५ डिसेंबरपर्यंत मास कम्युनिकेशनच्या मेलवर कलाकृती जमा करता येणार आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांका १५ हजार, द्वितीय क्रमांक १० तर तृतीय क्रमांकाला ७ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. सहभागींना विद्यापीठाचे सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

20 DEC 2025
लोकमत

# हॉटेलमध्ये कपबशा धुतल्याचा संघर्ष यशात झाला परावर्तित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर परिस्थितीशी झगडलो. शिक्षणात खंड पडू नये म्हणून काही वेळा हॉटेलमध्ये कपबशाही धुतल्या. मात्र, आज तोच संघर्ष यशात परिवर्तित झाला यापेक्षा दुसरा आनंद या शब्दांत शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभातील राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेल्या अक्षय नलवडे-जहागीरदार याने आपल्या भावना व्यक्त केल्या.

सातारा जिल्ह्यातील नावडी या दुर्गम भागातील अक्षय नलवडे-जहागीरदार यंदाच्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभातील राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरला आहे.

अक्षय हा मूळचा नावडी (ता.पाटण) येथील आहे. आई-वडील दोघेही शेती करतात. त्याचे माध्यमिक शिक्षण ठक्करबाप्पा ज्यु.कॉलेज मारूल हवेली येथे झाले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, कराड येथे पदवीचे शिक्षण पूर्ण केले. सध्या तो शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. पार्टटाईम खासगी नोकरी करून अक्षय स्वतःचा शिक्षणाचा खर्च भागवत आहे.

## संघर्षातून आर्याचे यश

१ हुपरी (ता.हातकणंगले) येथील आर्या देसाईने विद्यापीठाच्या यावर्षीच्या दीक्षांत समारंभातील कुलपती मेडल पटकावले आहे. आर्या हुपरी येथील असून वडील चांदी व्यावसायिक तर आई घरकाम करते. ती मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. तिचे कॉलेजचे शिक्षण राजाराम महाविद्यालयात झाले. त्यानंतर उरुण इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेताना तीन वर्षे खासगी नोकरी केली.

२ पदव्युतर पदवी मानसशास्त्र (क्लिनीकल सायकॉलॉजी) विषयातून पूर्ण केली. त्यावेळी सावली केअर सेंटरमध्ये काम केले. सध्या जोधपूर विद्यापीठामध्ये 'आरसीआय' लायसन्सचे शिक्षण घेत आहे. तसेच बिव्हेरियल थेरपीस्ट म्हणून काम करुन स्वतःचा खर्च भागवत आहे.

३ मेंटल हेल्थवर काम करण्याचा मानस तिने व्यक्त केला आहे.

अनेकवेळा अपुऱ्या पैशांमुळे अडचणी येतात व त्यावर मार्ग काढून न खचता शिक्षण घेत आहे.

20 DEC 2025 **तरुण भारत** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवकांनी राष्ट्रनिर्मिती, शाश्वत ग्रामविकासात सक्रिय सहभाग घ्यावा

- प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव
- कंदलगाव येथे महावीर महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

युवकांनी सामाजिक बांधिलकी, राष्ट्रनिर्मिती आणि शाश्वत ग्रामविकासात सक्रिय सहभाग घ्यावा. विविध शिबिरे आणि चळवळींमध्ये युवक– युवती आघाडीवर असल्याचे दिसून येते. युवतींनी स्व सबलीकरण करण्यावर भर द्यावा. शिबिरातील छोट्या छोट्या कृतीमधून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

महावीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाच्या वतीने आयोजित कंदलगाव (ता. करवीर) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या प्र– कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी होते. सरपंच राहुल वसंत पाटील प्रमुख म्हणून उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी चळवळ असून श्रमसंस्कार शिबिरातून सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि सेवाभाव विकसित होतो.



**कंदलगाव : येथे श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी** बोलतांना **शिवाजी विद्यापीठाच्या प्र– कुलगुरू** प्रा. डॉ. ज्योती जाधव. **सोबत प्राचार्य** डॉ. अद्वैत जोशी, **प्रा.** जावेद मेस्त्री, **प्रा. प्रियांका जाधव** आदी.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य सरदार माने म्हणाले, महावीर महाविद्यालय व ग्रामपंचायत कंदलगाव यांच्या संयुक्त प्रयत्नातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास प्रा. सचिन बराटे, प्रा. रविदास पाडवी, प्रा. जयवंत दळवी, डॉ. महादेव शिंदे, डॉ. शशिकांत अन्नदाते, प्रा. अंकित पोरवाल, प्रा. सुषमा चौगुले, प्रा. प्रियांका जाधव, श्रीमती योजना दुर्गुळे, राजाराम पांढरपळे, संग्राम पाटील, पांडुरंग घोलप यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अंकुश बनसोडे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. श्वेता परुळेकर यांनी करून दिली. सूत्रसंचलन तन्वी नलवडे आणि राजलक्ष्मी शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. प्रदीप गायकवाड यांनी मानले.

20 DEC 2025 **पुण्यनगरी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# कंदलगाव येथे श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**उचगाव :** महावीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाच्या वतीने आयोजित कंदलगाव (ता. करवीर) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी होते. सरपंच राहुल वसंत पाटील प्रमुख म्हणून उपस्थित होते.

यावेळी 'शाश्वत विकासातील युवक-युवती' या विषयावर बोलताना प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, युवकांनी सामाजिक बांधिलकी, राष्ट्रनिर्मिती व शाश्वत ग्रामविकासात सक्रिय सहभाग घ्यावा. अध्यक्षीय



**कंदलगाव येथे महावीर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव. सोबत प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी, जावेद मेस्त्री, प्रियांका जाधव आदी.**

भाषणात प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी चळवळ असून, श्रमसंस्कार शिबिरातून सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि सेवाभाव विकसित होतो. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अंकुश बनसोडे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. श्वेता परुळेकर यांनी करून दिली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सरदार माने यांनी मनोगत व्यक्त करताना महावीर महाविद्यालय व ग्रामपंचायत कंदलगाव यांच्या संयुक्त प्रयत्नातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. यांनी स्वयंसेवकांना शुभेच्छा देताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कंदलगाव या गावासाठी नियोजित कृती कार्यक्रमांना शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचलन तन्वी नलवडे व राजलक्ष्मी शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. प्रदीप गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमास सचिन बराटे, रविदास पाडवी, जयवंत दळवी, डॉ. महादेव शिंदे, डॉ. शशिकांत अन्नदाते, अंकित पोरवाल, सुषमा चौगुले, प्रियांका जाधव आदी प्राध्यापक वृंद, योजना दुर्गुळे, राजाराम पांढरपळे, संग्राम पाटील, पांडुरंग घोलप आदी उपस्थित होते.

20 DEC 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संहिता लेखनाला उत्तम वाचनाचा पाया आवश्यक

## माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तुमच्याकडे कल्पना आहेत, धडाडी आहे, लिखाणाच्या नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती आहे. मात्र, दर्जेदार संहिता उत्कृष्ट लेखनातून निर्माण होत असल्यामुळे संहिता लेखनाला उत्तम वाचनाचा पाया आवश्यक असल्याचे नव्या पिढीने लक्षात घ्यावे, असे प्रतिपादन माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी भाषा विभागाच्या वतीने आयोजित माध्यमे व संहिता लेखन या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर सत्रात ते बोलत होते. याप्रसंगी सहायक संचालक वृषाली पाटील, अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम प्रमुख उपस्थित होते. टाके म्हणाले, उत्तम लेखक बनण्यासाठी समाजाचे मूलभूत प्रश्न जाणून त्यावर झालेल्या लिखाणाचे वाचन करणे आवश्यक आहे. समाजाचे निरीक्षण तुम्हाला व्यक्त होण्याची संधी देते. मात्र, ते काळाच्या कसोटीवर तपासण्यासाठी काही संदर्भ आवश्यक असतात.



शिवाजी विद्यापीठातून

माध्यम क्षेत्रात उभे राहायचे असेल, तर शब्दांना योग्य न्याय देण्यासाठी वाचनाचा पाया भक्कम करणे आवश्यक आहे. माध्यमांचे जग मोठे असून, कोणत्या ठिकाणी आहोत, यामध्ये काय करू शकतो, कोणत्या एका विभागात अधिक चांगले करू शकतो, याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. माध्यमे, बातमी, लेख, अग्रलेख, कंटेंट रायटिंग, शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरीसाठी संहिता व माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची प्रसिद्धी यंत्रणा, करिअर संधी या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रकाश निकम यांनी करून दिला. समन्वयक डॉ. जयसिंग कांबळे यांनी आभार मानले.

20 DEC 2025

तरुण भारत

# संहिता लेखनासाठी उत्तम वाचन आवश्यक

■ माहिती उपसंचालक प्रवीण टाके

■ शिवाजी विद्यापीठात माध्यमे आणि संहिता लेखन कार्यशाळा

**कोल्हापूर :** युवा पिढीकडे कल्पना, धडाडी, लिखाणाच्या नवनवीन तंत्रज्ञानाची माहितीसह संहिता लेखनाला उत्तम वाचनाचा पाया आवश्यक आहे, असे प्रतिपादन माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी भाषा विभागाच्या वतीने आयोजित 'माध्यमे आणि संहिता लेखन" या विषयावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. टाके म्हणाले, उत्तम लेखक बनण्यासाठी समाजाचे मूलभूत प्रश्न जाणून त्यावर लिखाण करणे आवश्यक आहे. धर्मग्रंथ, पौराणिक कथा, प्रेरणादायी व्यक्तिमत्वांचे जीवन चरित्र, भारताचा इतिहास, लोकशाही, संविधान अशा विषयांवरील वाचनाने लिखाणाला धार, प्रगल्भता व नाविन्यता येते. सहायक संचालक वृषाली पाटील म्हणाल्या, समाजात सकारात्मक बदल घडवायचा असेल तर सामाजिक वास्तवाची माहिती घेऊन अचूक व परिणामकारक लिखाण करणे गरजेचे आहे. विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश निकम यांनी परिचय करून दिला. यावेळी हिंदी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ.करेकट्टी, सहायक संचालक वृषाली पाटील, अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. कांबळे, डॉ. निकम उपस्थित होते.

20 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल युग हे जीवनाचा अविभाज्य भाग

■ डॉ. सागर डेळेकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजचे डिजिटल युग हे केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. सागर डेळेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पीएमउषा योजनेअंतर्गत "विज्ञानाच्या अध्यापन आणि अध्ययनासाठी ई–कन्टेन्ट विकास" या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर उपकुलसचिव विनय शिंदे, एज्युटेक कॉर्पोरेशनचे तांत्रिक प्रशासक एकनाथ कोरे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते. कार्यशाळेत विविध विद्याशाखांतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

डॉ. डेळेकर पुढे म्हणाले की, ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग यांसारख्या तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. आज डिजिटल टूल्स, ॲप्स आणि ई–कन्टेन्ट हे दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनले असून, उच्च शिक्षण क्षेत्रात ई–कन्टेन्टला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, ई–कन्टेन्ट विकसित करताना तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त परिणामकारक वापर केला पाहिजे. भविष्यात शिक्षण क्षेत्रात ई–कन्टेन्टचे महत्त्व अधिक वाढणार असून शिक्षकांनी "कन्टेन्ट क्रिएटर" म्हणून स्वत:ला सिद्ध करणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात मार्गदर्शन करताना अहिल्यानगर येथील नॉलेज ब्रिज फाउंडेशनचे प्रशिक्षक श्री. भूषण कुलकर्णी म्हणाले की, अलीकडच्या काळात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. एक शिक्षक एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकतो, अशी अध्यापन पद्धत विकसित होत असून त्यासाठी दर्जेदार ई–कन्टेन्ट निर्मिती अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात हायब्रीड शिक्षण पद्धतीला विशेष महत्त्व येणार असल्याने कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य व जबाबदारीने वापर कसा करावा, याचे भान शिक्षकांनी ठेवले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी, तर आभार प्रदर्शन डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2025
पुण्यनगरी



# डिजिटल युग हे जीवनाचा अविभाज्य भाग : डॉ. डेळेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजचे डिजिटल युग हे केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. सागर डेळेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ येथील दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'पीएम-उषा' योजनेंतर्गत 'विज्ञानाच्या अध्यापन आणि अध्ययनासाठी ई-कन्टेन्ट विकास' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, एज्युटेक कॉर्पोरेशनचे तांत्रिक प्रशासक एकनाथ कोरे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते.

कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी भविष्यात शिक्षण क्षेत्रात ई-कन्टेन्टचे महत्त्व अधिक वाढणार असून, शिक्षकांनी 'कन्टेन्ट क्रिएटर' म्हणून स्वतःला सिद्ध करणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

पहिल्या सत्रात अहिल्यानगर येथील नॉलेज ब्रिज फाऊंडेशनचे प्रशिक्षक भूषण कुलकर्णी यांनी, भविष्यात हायब्रीड शिक्षण पद्धतीला विशेष महत्त्व येणार असल्याने कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य व जबाबदारीने वापर कसा करावा, याचे भान शिक्षकांनी ठेवले पाहिजे, असे सांगितले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. नितीन रणदिवे, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी यांनी केले. पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी यांनी करून दिली. आभार डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

20 DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची आज अधिसभा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक शनिवार (दि. २०) रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केली आहे. बैठकीत ३० हून अधिक प्रश्नांवर चर्चा होणार असून, यावेळी प्रथमच ११० हून अधिक ठराव मांडले जाणार आहेत.

विद्यापीठाची अधिसभा प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत. बैठकीत प्रश्नोत्तराचा तास, ऑडिट रिपोर्ट सादरीकरण व मंजुरी याविषयावर चर्चा होईल. त्यानंतर ११० ठरावांवर सभागृहात चर्चा होईल. अधिसभेत हिवाळी सत्र परीक्षेत नेमण्यात आलेली बैठे भरारी पथके, मान्यता काढून घेतलेली परीक्षा केंद्र, विद्यापीठ कार्यलयीन कामकाज जतन करून ठेवण्याचे निकष, विद्यार्थ्यांकडून जमा केलेले व महाविद्यालयांनी न भरलेले शुल्क आदी विषयांवरील प्रश्न सदस्य मांडणार आहेत.

20 DEC 2025
लोकमत

# विद्यापीठ अधिसभेची आज बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक आज, शनिवारी सकाळी ११ वाजता आयोजित केली आहे. बैठकीत ३० हून अधिक प्रश्नांवर चर्चा होणार असून यावेळी प्रथमच ११० हून अधिक ठराव मांडले जाणार आहेत.

विद्यापीठाची अधिसभा प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत. बैठकीत प्रश्नोत्तराचा तास, ऑडिट रिपोर्ट सादरीकरण व मंजुरी याविषयावर चर्चा होईल. त्यानंतर ११० ठरावांवर सभागृहात चर्चा होईल. अधिसभेत बैठे भरारी पथके, मान्यता काढून घेतलेली परीक्षा केंद्र, कार्यालयीन कामकाज जतन करुन ठेवण्याचे निकष, विद्यार्थ्यांकडून जमा केलेले व न महाविद्यालयांनी न भरलेले शुल्क आदी विषयांवरील प्रश्न सदस्य मांडणार आहेत.

20 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची आज अधिसभा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभेची बैठक शनिवार, दि.२० रोजी होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. आज सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या शाहू सभागृहात सभेला प्रारंभ होणार आहे. अधिसभेत ३० हून अधिक प्रश्नांवर चर्चा होणार असून ११० हून अधिक ठराव मांडले जाण्याची शक्यता आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाची अधिसभा होणार आहे. सभेत प्रश्नोत्तराचा तास, ऑडिट रिपोर्ट सादरीकरण व मंजुरी याविषयावर चर्चा होईल. यानंतर ११० ठरावावर सभागृहात चर्चा होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 0 DEC 2025
जनप्रवास

# संविधान जनजागृती प्रश्नमंजुषाचे आयोजन

**जनप्रवास : कोल्हापूर**

संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, अनुसूचित जाती, जमाती आयोगाच्या पुढाकाराने संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा - २०२५ हा उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी आयोजित केला आहे, अशी माहिती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिली. तसेच यातून विद्यार्थ्यांना जागरूक, उत्तरदायी आणि सशक्त नागरिक होण्याचे मार्गदर्शन मिळणार असल्याचे आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. मेश्राम यांनी सांगितले.




नागपूर येथे या बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे, संचालक शिक्षण, अवर सचिव अल्पसंख्याक विकास, सह सचिव इतर मागासवर्ग विभाग, सह संचालक उच्च शिक्षण, सह संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठ, राज्यातील सर्व जिल्हा माहिती अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

- **प्रथम पुरस्कार १ लाख रुपये**
- **३१ डिसेंबर पर्यंत नोंदणीचे आवाहन**
- **८ वी ते पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संधी**
- **मराठी, हिंदी, इंग्रजी तीन भाषा उपलब्ध**

### अशी असणार स्पर्धा

ही स्पर्धा ऑनलाईन स्वरूपात राज्यातील ८ वी ते पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली आहे. विद्यार्थी www.yuvacareer.com या संकेतस्थळावर भेट देऊन कार्यक्रमाची सविस्तर माहिती, नोंदणी प्रक्रिया, ऑनलाईन प्रशिक्षणचा तपशील जाणू शकतात. तसेच ही स्पर्धा तीन भाषांमध्ये (मराठी, इंग्रजी, हिंदी) असून विद्यार्थी इच्छेनुसार एक भाषा निवडू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ९९ रुपये शुल्क निश्चित केले गेले आहे. शाळा, महाविद्यालये, वसतिगृह आणि आश्रमशाळा यांना हे शुल्क भरावे लागेल.

### परीक्षा प्रक्रिया

३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी कालावधी आहे. मॉक टेस्ट : २० जानेवारी २०२६, पहिली फेरी क्विझ : २२ जानेवारी २०२६ तर अंतिम क्विझ : २६ जानेवारी २०२६ (प्रजासत्ताक दिन) अशी असणार आहे.

### पुरस्कार

प्रथम पुरस्कार १ लाख रुपये रोख रक्कम, चषक व प्रमाणपत्र, द्वितीय पुरस्कारः ५१ हजार रुपये (रोख रक्कम), चषक व प्रमाणपत्र, तृतीय पुरस्कारः ११ हजार (रोख रक्कम), चषक व प्रमाणपत्र तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. हे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचा सम्मान करेल आणि त्यांना भविष्यातील कार्यात प्रेरणा देईल.

20 DEC 2025

पुण्यनगरी

# जानेवारीमध्ये स्पार्क फिल्म फेस्टिव्हल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात दि. २ आणि ३ जानेवारी २०२६ रोजी स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. तसेच पर्यावरण विषयक शॉर्टफिल्म, डॉक्युमेंटरीच्या राज्यस्तरीय स्पर्धा मास कम्युनिकेशन विभागात बी. ए. फिल्म मेकिंग विभाग, लक्ष्मी फाऊंडेशन आणि किर्लोस्कर ऑईल इंजिन यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे. स्पर्धकांनी कलाकृती २५ डिसेंबरपर्यंत मास कम्युनिकेशनच्या मेलवर जमा कराव्यात, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.